महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) सोमवार, दिनांक १८ जुलै, २०१६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(क) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ११० ते १३९ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) **सर्वश्री हसन मुश्रीफ, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब पाटील, सरदार तारासिंह, सुरेश लाड, राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, वैभव पिचड, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"माहे जून, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास आदिवासी विभागातर्फे राज्यातील ५४४ आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी रेनकोट खरेदीकरीता शासनाने ई- निविदा काढणे, निविदा खुल्या करण्याच्या काही दिवस आधी आदिवासी विकास विभागाने ही प्रक्रिया रद्द करुन पावसाळा सुरु झाल्याने निविदा प्रक्रियेत अडकल्यास विद्यार्थ्यांना रेनकोट वेळेत मिळणार नाहीत असे कारण देऊन ठाणे, जव्हार व नाशिक विभागातील आश्रम शाळांमधील मुख्याध्यापकांना तीन लाखांपर्यंत रेनकोट खरेदीचे अधिकार दिल्याची बाब उघडकीस येणे, जानेवारी महिन्यात निविदा प्रक्रिया करुन आदिवासी आश्रमशाळांतील मुलांना मे महिन्यातच रेनकोट मिळतील असे नियोजन हेतूत: करण्यात न येणे, पुरवठादारांशी गेल्या अनेक वर्षापासून होत असलेली आर्थिक हातमिळवणी, यामुळे कायद्यातील पळवाटा शोधून विनानिविदा माल खरेदी करण्याकडे खात्यातील अधिकाऱ्यांचा असलेला भर व त्यामुळेच निविदा प्रक्रीयेस मुद्दामहून उशीर करुन विना निविदा खरेदी करणेबाबत सुरु असलेली कार्यवाही, शासन निर्णयानुसार आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकांना ५० हजारा पर्यंत वित्तीय मर्यादा घालून स्थानिक तातडीच्या बाबी खरेदी करण्याचे दिलेले अधिकार, परंतु सचिव, आदिवासी विकास यांनी मुख्याध्यापकांना तीन लाखापर्यंत रेनकोट खरेदी करण्याचे अधिकार देऊन शासन निर्णयाचे केलेले उल्लंघन, खात्यातील सचिव व अन्य अधिकारी निविदा प्रक्रीया वगळण्यासाठी अशा प्रकारे छोट्या स्वरुपात खरेदीचे

आदेश देत असल्याने, उच्च न्यायालयाने रेनकोट खरेदीवर स्थगिती दिल्यानंतरही राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन मुख्याध्यापकांना रेनकोट खरेदीच्या दिलेल्या आदेशामुळे उच्च न्यायालयाने आदिवासी विभागात स्वेटर, रेनकोट, शाळा गणवेश इ. खरेदीबाबत शासनाचे धोरण व निर्णय घेणाऱ्या व्यक्तीबाबत मागितलेले स्पष्टीकरण, गेली वर्षभर लाखो आदिवासी मुलांना स्वेटर मिळू न शकल्यामुळे व यावर्षी पावसाळ्यात रेनकोट मिळणार नसल्यामुळे आदिवासी विभागातील अधिकाऱ्यांच्या वर्तणुकीविरोधात विद्यार्थ्यांच्या पालकांत निर्माण झालेली तीव्र चीड याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ.मिलिंद माने, सर्वश्री सुधाकर कोहळे, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, अमीन पटेल, सुनिल प्रभू, डॉ. पतंगराव कदम, प्रा.वीरेंद्र जगताप, अस्लम शेख, मो.आरिफ नसीम खान, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, सुरेश लाड, बाळासाहेब पाटील, जितेंद्र आव्हाड, विकास कुंभारे, नितेश राणे, सुनिल शिंदे, श्रीमती सीमा हिरे, ॲड भिमराव धोंडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात महावितरण वीज कंपनीतर्फे वीज ग्राहकांवर १९ टक्के वीज दरवाढ आकारणी करुन शुल्कामध्ये टप्प्याटप्प्याने होत असलेली दर वाढ, शासनाने सर्वसामान्य ग्राहकांना आणि राज्यातून बाहेर जात असलेल्या उद्योगांना वीजेबाबत भारनियमन, कमी दराने वीजखरेदी, गळती कमी करणे तसेच वीजदर कमी करण्याचे आश्वासन देऊनही अंमलबजावणी न करता शासनाने केलेली नवी दरवाढ, महावितरणने माहे जून, २०१६ मध्ये वीज नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या प्रस्तावामध्ये इलेक्ट्रीसिटी डयुटीची केलेली मागणी, सदर मागणीमुळे कॅप्टीव्ह पॉवर बंद पडण्याची निर्माण झालेली शक्यता, उद्योगातील ओपन ॲक्सेस स्वीकारल्यामुळे वीज मंडळाला होणारे सुमारे ५ हजार कोटींच्या महसूलाचे नुकसान, या वीजदरवाढीमुळे महावितरण ग्राहकांकडून दरवाढीच्या सरासरी १९ टक्के रक्कम वसूल करणार असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, वीज दर कमी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

(३) **डॉ.मिलींद माने, सर्वश्री.संजय पोतनीस, विजय औटी, बाळासाहेब थोरात,विजय वडेट्टिवार, अस्लम शेख, प्रा.विरेंद्र जगताप, मो.आरिफ नसीम खान, सर्वश्री अमिन पटेल, जितेंद्र आव्हाड, हसन मुश्रीफ, जयंत पाटील, शशिकांत शिंदे,सय्यद इम्तीयाज जलील,ॲड.वारीस पठाण, वि.स.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अनुसुचित जाती व इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील सुमारे ८ लाख २० हजार विद्यार्थी सन २०१५-१६ या शैक्षणीक वर्षातील सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येणाऱ्या १६०० कोटी रकमेच्या शिष्यवृत्ती पासून वंचित राहिले असल्याचे माहे जुन, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, निधीची कमतरता आणि विभागाच्या अधिका-यांमधील नियोजनाचा अभाव व हलगर्जीपणा अशी कारणे त्यासाठी

सांगितली जात असणे, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे ७५० कोटी रुपये निधीचे वितरण न झाल्यामुळे विनाखर्च पडून असणे, केंद्राकडून राज्यात देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेपैकी ३०-५० % रक्कम संस्थाचालक, संबंधित अधिकारी व सॉफ्टवेअर कंपनीद्वारे हडप केल्याचे याप्रकरणी डॉ.के.वेंकटेशन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कृती दलाने सहा जिल्ह्यात केलेल्या तपासणीत उघडकीस येणे, उक्त कारणास्तव सदरहू प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

चार : अध्यक्ष, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करतील.

पाच : **महाराष्ट्र विधानसभा नियम १४१(१) अन्वये मा. अध्यक्षांनी करावयाची घोषणा.**

सहा : **शासकीय विधेयके :**

पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.

(२) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६.

(३) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६.

(४) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६.

(५) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६.

सात : **अल्पकालीन चर्चा - (म.वि.स. नियम १०१ अन्वये)-**

सर्वश्री जयंत पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, शशिकांत शिंदे, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-

"दिनांक १३ जुलै, २०१६ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कोपर्डी येथे नवव्या इयत्तेत शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर करण्यात आलेला सामुहिक बलात्कार, बलात्कार

केल्यानंतर आरोपींनी त्या मुलीचे हात पाय व मान मोडून अनन्वीत छळ करुन तिची करण्यात आलेली निर्घृण हत्या, मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेमुळे तेथील नागरिकांत विशेषत: विद्यार्थीनीमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, या घटनेच्या निषेधार्थ सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी राज्यात ठिकठिकाणी आयोजित केलेले धरणे व मोर्चा आंदोलने, तर काही ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात येणे, या घटनेचा तातडीने तपास करुन हा खटला द्रुतगती न्यायालयात चालवावा तसेच यासाठी ज्येष्ठ वकिल श्री. उज्वल निकम यांची नियुक्ती करावी अशी होत असलेली मागणी, अहमदनगर जिल्ह्यात मनाला सुन्न करणारी घटना घडलेली असताना त्या ठिकाणी वेळीच पालकमंत्री व मंत्र्यांनी भेट न दिल्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, कायदा व सुव्यवस्था राखण्यात शासनाला आलेले अपयश, आरोपींना त्वरित अटक करुन त्यांना कठोर शिक्षा करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

आठ : **सर्वश्री राज पुरोहित, सुनिल प्रभू, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री प्रताप सरनाईक, संजय केळकर, सुनिल शिंदे, राजेंद्र पाटणी, प्रकाश आबिटकर, ॲड. पराग अळवणी, डॉ.राहुल पाटील, प्रा.मेधा कुलकर्णी, सर्वश्री अजय चौधरी, प्रशांत बंब, सुनिल राऊत, प्रा. देवयानी फरांदे, डॉ. मिलिंद माने, डॉ. अशोक उईके, सर्वश्री मंगेश कुडाळकर, उन्मेश पाटील, उल्हास पाटील, समीर कुणावार, किशोर पाटील, डॉ.आशिष देशमुख, डॉ.बालाजी किणीकर, श्री नरेंद्र पवार, प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"शैक्षणिक क्षेत्रामध्ये राज्य अग्रेसर रहावे म्हणून शासनाने राबविलेल्या प्रगत शैक्षणिक कार्यक्रम व त्याला मिळणारे यश, ग्रामीण भागामध्ये विनामुल्य शिक्षण देणाऱ्या जिल्हा परिषद शाळा प्रगत करण्यासाठी शासन करीत असलेले प्रयत्न, त्याकरिता भरविण्यात येणारी शैक्षणिक चर्चा सत्रे, शिक्षकांचे प्रशिक्षण इत्यादीमुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळा सोडून जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या, शासनाच्या चांगल्या शैक्षणिक धोरणांचा परिणाम म्हणून इ. १० वीच्या परिक्षेचा वाढता निकाल व त्यामुळे इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी निर्माण झालेली वाढती चुरस, त्या अडचणीत भर म्हणजे प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असणारा अधिवास दाखला, उत्पन्नाचा दाखला व जातीचा दाखला मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना तहसिलदार कार्यालयात मारावे लागणारे हेलपाटे, केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबंधित दाखले विद्यार्थ्यांना शाळेत निकालासोबत देण्याची आवश्यकता, इयत्ता ११ वी व १२ वी ची फेरपरिक्षा घेऊन विद्यार्थ्यांचे वाचलेले वर्ष, इयत्ता १० वी उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी प्रवेश देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाने लाखो विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असणे परंतु, त्याचवेळेस खाजगी संस्था चालक ऑफ लाईन प्रवेश देऊन लाखो रुपयांचा गैरव्यवहार करीत असल्याची बाब निदर्शनास येणे, अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याची बाब तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, नवीन शाळा/महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, अभियांत्रिकी, व्यवस्थापन महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जागा रिकाम्या असणे, नवीन विद्यापीठ कायदा त्वरित अंमलात येणे या व इतर मागण्या तातडीने सोडविण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नऊ : **अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

(१) **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.**

"**बुलढाणा जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थी गणवेश व लेखन साहित्य योजनेपासून वंचित असल्याबाबत**" या विषयावर श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४७७९९ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स.**

"**उल्हासनगर पाणी वितरण व्यवस्थेची चौकशी करण्याबाबत**" या विषयावर श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५०१६७ ला दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १८ जुलै, २०१६

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.